Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# संस्कृतीपासून आधुनिकतेकडे : आंध आदिवासी जमातीची प्रवास

**दांडेगावकर गजानन सुखाजी**
संशोधक विद्यार्थी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
मो.नं.7770066608
gajanansd01@gmail.com

**प्रस्तावना :-**

निसर्गपूजक असलेली आंध आदिवासी जमात ही विकसित समाजापासून अलिप्त राहणारी, साधी-सरळ व प्रारंभिक अवस्थेतील जीवन जगणारी जमात म्हणून ओळखली जाते. कालांतराने आंध जमातीचा संबंध विकसित समाजाशी वाढू लागला. आंध ही आर्येतर आदिवासी जमात असल्याचे ऐतरेयण ब्राह्मण या प्राचीन ग्रंथामध्ये नमूद केले आहे. प्राचीन वाङ्मयात आंध जमातीचा उल्लेख वेगवेगळ्या नावांनी येतो. सुलभ विश्वकोश भाग-१ मध्ये श्री. य. रा. दाते आणि चि. ग. कर्वे यांनी आंध ही आंध्राची पोटजात असावी व आंध्रचा अपभ्रंश होऊन "आंध" असे नाव पडले असावे, असे मत मांडले आहे. महाराष्ट्र ज्ञानकोश (शरीर खंड विभाग ७) मध्ये श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी लिहिलेल्या खंडामध्ये अशोकाच्या शिलालेख क्रमांक १३ वर "आंध्र" या जातीचा उल्लेख केला आहे. त्याचा अपभ्रंश होऊन "आंध" या जमातीला सध्या ओळखले जाते. [१]

भारतीय संविधान कलम ३४२ (१) अन्वये राष्ट्रपतींनी संबंधित राज्यांच्या राज्यपालांशी व राजप्रमुखांशी चर्चा करून अनुसूचित जमातींची (Scheduled Tribes) यादी भारतीय संविधान (अनुसूचित जमाती) आदेश १९५० अन्वये दि. ६ सप्टेंबर १९५० रोजी अंमलात आणली. या यादीत आंध जमातीचा समावेश मध्यप्रदेशात क्र. २ तर जुन्या हैदराबाद राज्यात क्र. १ वर करण्यात आला होता. संविधान (अनुसूचित जमाती) आदेश १९५० मध्ये राज्य पुनर्रचना कायदा १९५६ अस्तित्वात आल्यामुळे बदल करून नवीन अनुसूचित जाती-जमाती सूची (सुधारित) आदेश १९५६ अस्तित्वात आला. तसेच सन १९६० मध्ये बॉम्बे पुनर्संघटन कायदा अस्तित्वात आला. त्यानुसार आंध जमात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि मध्यप्रदेश या प्रादेशिक विभागांत दाखविण्यात आली. कॉम्बेल यांनी ते संपादन केलेले आहे. प्रस्तुत जिल्हा गॅझेटिअरचे प्रकाशन १९७९ मध्ये झाले आहे. इ.स. १९०८ मध्ये आंध जमातीबद्दल Aboriginal Tribe ही नोंद

आदिवासीसाठी अतिशय महत्त्वाची आहे. आंध ही आदिम जमात म्हणजे भारतभूमीवरील मूळ निवासी असल्याचे इंग्रजांच्या जिल्हा गॅझेटिअरमध्ये नमूद आहे.[२] 'आंध' ही महाराष्ट्र राज्यातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. त्यांची बस्ती प्रामुख्याने परभणी (१५,५७८), नांदेड (८७,५७७), यवतमाळ (१,४८,७२४), अकोला (२३,२३३), वाशीम (६३,५७७) आणि हिंगोली (१,०१,२४४) या जिल्ह्यांत आढळून येते. सन २०११ च्या जनगणनेनुसार त्यांची एकूण संख्या ४,७४,११० इतकी आहे. आंध्र प्रदेशालगतच्या क्षेत्रातून येणाऱ्या तेलुगू भाषिक लोकांचा आंध जमातीच्या लोकांवर मोठा प्रभाव पडलेला आहे.

आंध ही आंध्र प्रदेशातील आर्येतर जमात असल्याचे दिसते आणि त्यावरूनच त्यांना हे नाव पडले असावे. इसवी सनाच्या प्रारंभीच्या काळात पूर्व-पश्चिम अशा दोन्ही सागरकिनाऱ्यांच्या दरम्यान दक्षिण भारतभर आंध्र राजवंशाचे अधिपत्य होते. अद्याप या प्रदेशातील बरेच लोक पैनगंगा नदीपलीकडील हैदराबाद भागातून येतात. आंध ही गोंड जमातीची शाखा असल्याचे काहींचे मत आहे; मात्र आंध स्वतःला गोंड जमातीहून वेगळी व स्वतंत्र मानते. आंध जमात रंगाने काळी, ओठ जाड व गालांची हाडे उठून दिसणारी अशी असल्याने त्यांच्या ठिकाणी आदिवासींची ठळक लक्षणे दृष्टोत्पत्तीस येतात. आंध जमात दोन गटांत विभागली आहे — (१) वरताळी (किंवा खानदानी) आणि (२) खलताबी (किंवा अनौरस).[३]

**उद्दिष्टे :-**

१. आंध जमातीच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करणे.

२. आधुनिक समाजाच्या प्रभावामुळे जीवनपद्धतीत झालेल्या बदलांचा उलगडा करणे.

३. शिक्षण, शासकीय योजना आणि आधुनिकीकरणामुळे झालेल्या सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती :-**

या शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीवर आधारित ऐतिहासिक, समाजशास्त्रीय आणि सांस्कृतिक विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. विविध ग्रंथ, विश्वकोश, जिल्हा गॅझेटिअर, शासकीय अहवाल, तसेच जनगणना आकडेवारी यांचा संदर्भ घेण्यात आला आहे.

**आंध जमातीचा संस्कृतीपासून आधुनिकतेकडे वाटचाल :-**

आंध जमातीने ग्रामीण व नागरी जीवनपद्धतीपेक्षा काही बाबतीत भिन्न असणारी आपली वेगळी अशी जीवनवैशिष्ट्ये प्रयत्नपूर्वक जतन करून ठेवली आहेत. प्राचीनकाळापासून या जमातीची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. मात्र प्रगत समाजाच्या संपर्कामुळे आंध जमातीच्या जीवनशैलीत बदल झाला आहे. सुमारे ८०

टक्के आंध जमात जंगल परिसरात वसलेली आहे. पूर्वी शेती व जंगलातील कंदमुळे, फळे, भाज्या, विविध प्राणी हेच त्यांच्या उपजीविकेची साधने होती. दुष्काळी परिस्थितीत आंध समाज बेल, मोहाची फुले व विविध भाज्या, अंबाडीची भाजी खाऊन कसाबसा उदरनिर्वाह करत असे. तसेच वनामध्ये मिळणारे डिंक, मोहाची फुले, मध, टेभुणींची पाने, चारोळी, लाख यांसारख्या गौण वनोत्पादनांमुळे महिलांना व पुरुषांना रोजगार मिळतो. [४]

आंध जमातीचे मुख्य अन्न ज्वारीची भाकरी, तूर, वाल, मूग आणि उडदाचे वरण तसेच शेतात पिकवला जाणारा भाजीपाला हे आहे. आंध जमातीच्या लोकांना मांसाहार आवडतो. मांसाहाराबरोबर त्यांना मद्यपान करण्याचीही आवड आहे. मोहाच्या फुलांपासून परंपरागत पद्धतीने दारू तयार केली जात होती. परंतु सरकारच्या दारूबंदी कायद्यामुळे दारू तयार करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. आजही काही आंध लोक मोहाची दारू तयार करतात. नागरिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या प्रभावामुळे आता देशीदारूचा वापरही वाढलेला दिसतो. पूर्वी स्त्रियाही मद्यपान करीत असत, परंतु आज स्त्रियांमध्ये ते प्रमाण लक्षणीयरीत्या घटलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणातील वाढते प्रमाण व इतर समाजाशी वाढत चाललेला संपर्क होय. आंध जमात निसर्गपूजक असून ते जंगलातील वृक्ष, प्राणी, जल, अग्नी, आकाश यांना देव मानून त्यांची उपासना करतात. त्यांचे संपूर्ण जीवन निसर्गाच्या सान्निध्यात व्यतीत होत असल्याने निसर्गातील अलौकिक शक्तीची उपासना करणे ते आवश्यक मानतात.[५] देवी-देवतांची पूजा नैवेद्य अर्पण करून केली जाते.

आंध जमात स्वतःला हिंदू म्हणवते; मात्र आपली आदिवासी ओळख वेगळी जपते. आंध जमात प्रामुख्याने महादेव, खंडोबा व कान्होबा या देवतांचे उपासक आहेत. कोणतेही कार्य सुरू करताना हे लोक या आराध्य देवतांची प्रार्थना करतात. रोगराईपासून मुक्तता होण्यासाठी ते देव-देवतांना 'माया, आई, देवस, बाप, बाबा' अशा नावांनी हाक मारतात. लोक नवस करतात आणि मनोकामना पूर्ण झाल्यास दरवर्षी नवस फेडून पूजा करतात, याला 'पूजापत्ती करणे' असे म्हणतात. या वेळी नैवेद्य, तुपाचा दिवा, आरती केली जाते. काही लोक बोकडाचा नवस करतात आणि नवस फेडण्यासाठी बोकडाचा बळी देतात. या कार्यक्रमासाठी गावकरी, नातेवाईक व कुटुंबीय एकत्र येतात. पूजा करून प्रसाद म्हणून बोकडाची भाजी केली जाते व सर्वजण ती खातात.[६] आंध जमातीची संस्कृती, आचार-विचार, खाणेपिणे, परंपरा यांचे अवलोकन करता असे दिसते की त्यांची जीवनशैली इतर समाजांपेक्षा भिन्न आहे. एम. श्रीनिवासन यांच्या मते, हिंदू धर्मातील जातिसंस्थेशी आदिवासी समुदायाचा सर्वांत अधिक संबंध आलेला दिसतो.[७]

आदिवासींनी हिंदूधर्मियांकडून काही धार्मिक प्रथा देखील स्वीकारलेल्या आहेत. आदिवासी प्रामुख्याने निसर्गपूजक आहेत, मात्र हिंदूधर्माच्या प्रभावामुळे त्यांनी हिंदू देव-देवतांचा देखील स्वीकार केला आहे. आंध जमातीत हिंदू सणवार व उत्सव साजरे केले जातात. संक्रांत सणाला हिंदू स्त्रियांप्रमाणे आंध स्त्रिया देखील वाण देतात आणि राखी पौर्णिमेला भावाला बहिणी राखी बांधतात. पूर्वी राखी बांधली जात नव्हती. हिंदूधर्मातील सण-उत्सवांचे अनुकरण आंध जमातीतील महिलांनी केलेले दिसते. आंध जमातीतील सण-उत्सव प्रसंगीची गाणी मात्र हिंदुंपेक्षा वेगळी असलेली दिसतात. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध धार्मिक संस्कार पूर्वीप्रमाणेच काटेकोरपणे केले जात असल्याचे दिसून येते.[८]

आंध जमातीच्या धार्मिक जीवनावर हिंदूधर्माचा प्रभाव अधिक असल्याचे जाणवते. आज आंध समुदायातील देवी-देवतांबरोबरच राम, कृष्ण, गणपती, विष्णू, विठ्ठल-रुखमाई अशा देवी-देवतांची पूजा केली जाते. त्याचबरोबर साईबाबा, राजानन महाराज यांच्यावरही त्यांची श्रद्धा असल्याचे दिसते. आज पूजा पद्धतीमध्ये बळीपूजा करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. पूजा आणि नवस आता साध्या पद्धतीने केले जातात. आज आंध लोक काशी, प्रयाग, मथुरा, नाशिक, केदारनाथ, बद्रीनाथ, तिरुपती येथील बालाजी, शेगाव, शनि शिंगणापूर अशा हिंदू धार्मिक स्थळांना भेटी देतात.[९] आंध जमातीतील लोकांचा जादूटोण्यावर विश्वास असल्यामुळे ते मूठ मारणे, भानामती करणे, कुसळी आणि भूत-प्रेत अशा अघोरी कृत्यांवर विश्वास ठेवतात. यात गोष्टींबद्दल असलेल्या अज्ञानामुळे आंध जमातीतील लोक यास सत्य मानतात. मात्र आधुनिक युगात शिक्षणाच्या प्रसारामुळे, प्रसारमाध्यमांमुळे व नव-नवीन तंत्रज्ञानामुळे जुन्या रूढी-परंपरा व अंधश्रद्धांचा त्यांच्यावरील प्रभाव कमी होताना दिसून येत आहे. पूर्वी आजार दूर करण्यासाठी नवस केला जात असे. आज आधुनिक उपचारपद्धतीमुळे देवी-देवतांवरील विश्वास कमी झाला असून आजार ठीक होण्यासाठी नवस करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. असे सकारात्मक परिणाम होताना आपल्याला दिसत आहेत. आंध जमातीच्या पोशाखातही बदल झालेला दिसून येतो. पूर्वी पुरुषांचा पोशाख कुर्ता-धोतर, बंडी, पटका आणि टोपी तर महिलांचा पेहराव नऊवारी लुगडे व चोळी असायचा.[१०] आज महिला साडी व ब्लाऊज वापरतात, तर बहुतांश पुरुष देखील धोतर-सदऱ्याऐवजी आधुनिक पॅन्ट-शर्ट परिधान करतात. आंध तरुण आधुनिक फॅशनप्रमाणे केशभूषा करताना आढळतात.

दिंडार हे आंध जमातीसाठी मनोरंजनाचे माध्यम होते. पूर्वी दिंडारामध्ये पौराणिक कथा घेऊन दिंडार केला जात होता. आज पौराणिक कथांऐवजी वर्तमान समाजातील व्यंगांवर बोट ठेवून दिंडार केला जातो. प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी हास्य-विनोद केले जातात. आज दिंडारात चित्रपट गाण्यांच्या चालीवर अभंग,

गवळणी म्हटल्या जातात. आधुनिक मनोरंजनाची साधने व संस्कृतीचा हा प्रभाव आहे असे म्हणता येईल. आंधांच्या दिंडार या नृत्यनाट्याचे झालेले हे रुपांतर संस्कृतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करते.[११] शेती हा आंध लोकांचा पारंपरिक व प्रमुख व्यवसाय आहे, तर पशुपालन, शिकार आणि सरपण गोळा करणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय आहेत. आंध जमातीतील काही लोक रोजंदारीवर काम करतात. आज काही आंध लोक दुसऱ्याची शेती कसणे व त्याचबरोबर शेती विभागून ती कसणे अशा प्रकारची कामे करतात. बरेच आंध लोक आज सरकारी खात्यात लेखनिक तसेच शिक्षक म्हणूनही काम करू लागले आहेत.[१२] कृषी व्यवसायासंबंधी धार्मिक विधींमध्ये बदल झाला आहे. आता पेरणी, पीककाढणी अशा वेळी पूजा-अर्चा केली जाते. कारण आज लाकडी अवजारे क्वचितच दिसतात. शासकीय योजनांच्या लाभान्वये अनेक आंध लोकांना लोखंडी अवजारे मिळालेली आहेत. शिवाय आधुनिक मळणी यंत्रे देखील मिळालेली असून धार्मिक विधी, पूजा-अर्चा यांचे प्रमाण कमी झालेले दिसते.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे नवीन कौशल्ये आत्मसात केली जातात आणि त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात. स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी शासनव्यवस्था स्वीकारल्यामुळे सर्वांचे हित साधणे व सर्वांचा विकास घडवून आणणे हे शासनाचे कर्तव्य मानले गेले. त्यामुळे संविधानात समाजातील इतर मागास घटकांबरोबरच अनुसूचित जमातीच्या लोकांनाही शिक्षण घेता यावे यासाठी काही तरतुदी केलेल्या दिसतात. संविधानातील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतिगृहे, आरक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्वयंरोजगार प्रशिक्षण अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. त्याचाच लाभ घेतल्याने आंध जमातीत परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली आहे.

**निष्कर्ष :-**

आंध आदिवासी जमात प्राचीन काळापासून स्वतंत्र सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपणारी, निसर्गपूजक आणि परंपरेशी निष्ठावंत अशी समाजघटक म्हणून ओळखली जाते. त्यांच्या उपजीविकेचे साधन पारंपरिक शेती, शिकार आणि वनोत्पादन होते. अन्न, पोशाख, पूजा-पद्धती, सण-उत्सव या सर्व बाबींमध्ये त्यांचे जीवन ग्रामीण व नागरी समाजापेक्षा भिन्न राहिले. मात्र कालांतराने शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरीकरण, प्रसारमाध्यमे आणि शासकीय कल्याणकारी योजना यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत लक्षणीय बदल झाले. पारंपरिक दारू उत्पादन, बळी देण्याच्या प्रथा, अंधश्रद्धा यांचे प्रमाण कमी झाले, तर आधुनिक पोशाख, धार्मिक यात्रांचे प्रचलन आणि शैक्षणिक प्रगती वाढली. 'दिंडार' सारख्या पारंपरिक कलांमध्येही सामाजिक

विषय आणि आधुनिक गाणी येऊ लागली. शिक्षणामुळे तरुण पिढी शासकीय नोकऱ्या, शिक्षक, लिपिक अशा पदांवर कार्यरत झाली आहे. आंध आदिवासी जमात ही प्राचीन परंपरा व आधुनिकतेचा संगम साधत असलेली जमात आहे. तिच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनात शिक्षण आणि शासकीय कल्याणकारी योजनांचा मोठा वाटा असून, परंपरा टिकवून ठेवत आधुनिक समाजाशी जुळवून घेण्याची क्षमता हीच आंध जमातीची खरी ताकद आहे.

**ग्रंथसूची :-**

१. भिसे, तुकाराम, २०१८, आंध जमातीचा प्राचीन, वांशिक व राजकीय इतिहास, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृष्ठ क्र.१८४

२. भिसे, तुकाराम २०१८, उपरोक्त, पृष्ठ क्र. १८२,१८३

३. गारे, गोविंद २०००, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ४१

४. भिसे, तुकाराम २०१८, उपरोक्त, पृष्ठ क्र.१४९

५. देशमुख, विश्वनाथ २०१७, आंध आदिवासी लोकगीतों का सांस्कृतिक अध्ययन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे हिंदी
विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, पृष्ठ क्र.१३

६. गारे, गोविंद, वर, पृष्ठ क्रमांक ४३

७. श्रीनिवास, एम. एन. १९५२, दक्षिण भारतातील कूर्गसमध्ये धर्म आणि समाज: ऑक्सफर्ड: क्लॅरेंडन प्रेस.

८. शिंदे, पंडित २००१, मराठवाड्यातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर केलेला प्रबंण, पृष्ठ क्र.१८३

९. शिंदे, पंडित, उपरोक्त २००१, पृष्ठ क्र. १८२

१०. सेन्सेस ऑफ इंडिया, १९६१, शेड्युल्ड ट्राईब्स इन महाराष्ट्रा एन्थोग्राफिक नोटस, १९७२.

११. शिंदे, पंडित, २००१, उपरोक्त, पृष्ठ क्र. १८१

१२. कुलकर्णी, रौनक, २००९, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. १३